ePaper

**मोदींनी केदारनाथ गुहेत जाऊन तपश्चर्या करण्याची वेळ आली आहे": संजय राऊत!**



| वर्ष - 7 | अंक - 268 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | रविवार, दिनांक 11 फेब्रुवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

## आतील पानांत


- पुण्याच्या रस्त्यावरही दहशतीचे दर्शन
- चिखलीत 200 एमएलडी डब्लुटीपी प्लँट!
- मी जय श्रीराम नक्कीच म्हणेन!
- तीन सामन्यांसाठी भारतीय संघाची घोषणा


# महाराष्ट्र पूर्ण बदनाम करून टाकला!

## राज्यात झालेल्या गोळीबाराच्या प्रकरणावरून उद्धव ठाकरेंची सरकारवर जहरी टीका

। मुंबई । महाईन्यूज

**महाराष्ट्रात सध्या गुंडगर्दी सुरू आहे. महाराष्ट्र पूर्ण बदनाम करून टाकला आहे. राज्यात कोणते उद्योगधंदे येणार नाही अशी परिस्थिती निर्माण केली आहे. हे या नाकर्त्या राज्यकर्त्यांना कळत नाही आहे. महाराष्ट्राची अशी बदनामी करायची की महाराष्ट्रात कोणी येऊच नये अशी परिस्थिती निर्माण करायची. मुंबईत राहणाऱ्यांची इतकी वाट लावायची की मुंबई पूर्ण भिकेला लावायची. हे बघून जीव जळतोय म्हणून लढाईला उभा आहे, असं वक्तव्य राज्यात झालेल्या गोळीबाराच्या प्रकरणावर उद्धव ठाकरे यांनी केलं आहे.**



दरम्यान उद्धव ठाकरे आज धारावीत आले होते. यावेळी त्यांनी धारावीकरांजवळ संवाद साधला आहे. अभिषेक घोसाळकर यांच्यावर झालेल्या गोळीबार प्रकरणी उद्धव ठाकरेंनी सरकारसह गृहमंत्र्यांना चांगलंच धारेवर धरलं आहे. ते म्हणाले की, काल परवा आमचा चांगला कार्यकर्ता अभिषेक घोसाळकर मारला गेला. यावर आज मी बोललो. गेल्या आठवड्यात भाजपच्या आमदाराने पोलीस स्टेशनमध्ये गोळीबार केला. आमच्या एका कार्यकर्त्यावर गोळीबार त्याची हत्या झाली. आज जळगावमध्येही भाजपच्या माजी नगरसेवकाची हत्या झाली. सर्वच ठिकाणी हत्या होत आहेत. मात्र गृहमंत्री आहेत की नाही? असा सवाल थेट उद्धव ठाकरेंनी गृहमंत्र्यांना केला आहे.

उद्धव ठाकरे पुढे म्हणाले की, या घटनांनंतर गृहमंत्र्यांकडे राजीनामा मागितल्यावर गृहमंत्री म्हणतात, उद्या गाडीखाली कुत्रा आला तरी तुम्ही माझा राजीनामा मागाल. मग तुम्ही यांच्याकडे मत मागायला कशाला येता. आमचा कार्यकर्ता मारला गेला म्हणून आम्ही आवाज उठवला. मात्र तुमच्या लेखी ही सर्व जनता कुत्र्यामांजरासाठी असेल तर निवडणुकीसाठी मत मागायला आल्यावर तुम्हालाही त्यांच्या पेकाटात लाथ घालावीच लागेल. तुमची शक्ती काय आहे ही जर तुम्ही दाखवून देऊ शकला नाही तर आवो जाओ घर तुम्हाला तसेच आम्हाला मिठागरात टाका नाहीतर अजून कुठेही टाका, आम्हाला काही फरक पडत नाही, असं होईल. म्हणूनच मी तुम्ही जागे आहात की नाही हे पाहायला आलो होतो.

ते म्हणाले की, मला काही साटलोट करायचं असतं तर मी करून मोकळा झालो असतो. तुम्हाला कळलेही नसतं. मात्र मी गरिबांसोबत उभा राहिलो आहे. ही माझी ताकद आहे. तुमच्यासाठी मी लढाईला उभा राहिलो आहे. करार करणं सोप आहे. मात्र तुमचं आयुष्य खराब करुन मी कोणता करार करणार नाही, असं वक्तव्य ठाकरेंनी केले आहे.

### फडणवीसांवर हल्लाबोल

**आगामी निवडणुकीवर ठाकरे म्हणाले की, आता निवडणुक तोंडावर आली आहे. दिल्लीत तुमच्यासाठी आवाज उठवणारा खासदार तुम्हाला हवा आहे की, आपण इथून जसा पाठवलेला गद्दार खासदार तुम्हाला हवा आहे, असा सवाल ठाकरेंनी धारावीकरांना विचारला. ते पुढे म्हणाले की, दिल्लीत जाऊन खुर्चीचे तळवे चाटणारा खासदार तुम्हाला हवा आहे का हे तुम्ही ठरवायचं आहे. हा निर्णय तुम्ही घेतला आहे. आम्ही मैदानात उतरलो आहोत. या लढाईत मी पुढे आलोच आहे. मात्र तुम्ही साथ देणार आहात की नाही? उद्या तुमच्यावर पैशाचा वापर होईल. विकले जाणार आहात का ? तुम्ही जागा विकणार नाही तर तुमच्या पिढ्यांचे आयुष्य विकणार आहात. हे आयुष्यही आता गुंडगिरी करणाऱ्या सरकारकडे आणि त्यांच्या दलालाकडे विकणार आहात. यामुळे कोणत्याही दहशतीला बळी पडू नका. अदानींच्या दलाला घाबरु नका, असं आवाहन करत ठाकरे म्हणाले, आता मी घोषणा करतो धारावीकरांनो ठाम उभं राहा. पूर्ण शिवसेना तुमच्यासोबत आहे, असं वचन उद्धव ठाकरेंनी यावेळी धारावीकरांना दिलं आहे.**

# बीव्हीजी ॲग्रोटेकचे 'गो से गोमाता' अभियान उत्साहात

## 300 शेतकऱ्यांना भाकड जनावरांसाठी वरदान असलेले 'रज्जो' औषधाचे मोफत वाटप

। वडगाव मावळ । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बीव्हीजी ॲग्रोटेक कंपनीमार्फत तालुक्यात 'गो से गोमाता' अभियान राबविण्यात उत्साहात पार पडले. या अभियानांतर्गत पहिल्या टप्प्यात मावळातील १२०० भाकड जनावरे दुभती होणार आहेत. आमदार सुनिल शेळके व बीव्हीजी ॲग्रोटेक कंपनीच्या वतीने मावळ तालुक्यातील तीनशे दुग्ध व्यावसायिक शेतकऱ्यांना भाकड जनावरांसाठी वरदान असलेले 'रज्जो' औषधाचे मोफत वाटप करण्यात आले.**




जानेवारी महिन्यात भारत विकास ग्रुपचे अध्यक्ष हणमंतराव गायकवाड यांनी आमदार सुनिल शेळके यांची भेट घेऊन मावळातील शेती,रोजगार अशा विविध क्षेत्रासाठी सहकार्य व मार्गदर्शन करण्याचे आश्वासन दिले होते.त्या अनुषंगाने आमदार सुनिल शेळके यांच्या सहकार्यातून बीव्हीजी ग्रुपने पहिले पाऊल टाकले आहे. या कार्यक्रमाचे स्वागत अरुण बारगजे यांनी तर आभार रवि घाटे यांनी केले.

> “ बीव्हीजी ॲग्रोटेक कंपनीच्यावतीने आपल्या तालुक्यात सेंद्रिय इंद्रायणी भात निर्मितीसाठी विशेष प्रकल्प राबविण्यात येणार आहे. या प्रकल्पाद्वारे भात उत्पादक शेतकऱ्यांना बीव्हीजीची सेंद्रिय खते, औषधे देण्यात येणार आहेत. जगभरात सेंद्रिय शेतमाल निर्मितीची चळवळ शेतकऱ्यांच्या साथीने उभारली जात आहे आणि या चळवळीची सुरुवात आजच्या अभियानाने झाली आहे. बीव्हीजी ग्रुपच्या माध्यमातून अधिकाधिक शेतकऱ्यांना समृद्ध बनविण्यासाठी उपक्रम राबविण्याचा मानस आहे.
>
> **-सुनील शेळके, आमदार**

# पुण्याच्या रस्त्यावरही दहशतीचे दर्शन

## फडतूसपणा बंद करा : अंबादास दानवेंचा सरकारवर हल्लाबोल

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी (PM NARENDRA MODI) यांच्यावर आक्षेपार्ह वक्तव्य केल्याने पुण्यात निर्भय बनो कार्यक्रमाला जात असताना भाजपकडून पत्रकार निखिल वागळे (NIKHIL WAGLE) यांच्यावर हल्ला करण्यात आला. त्यांच्यावर शाईफेकदेखील करण्यात आली. यावेळी काही शरद पवार गटाच्या महिलांना भाजपकडून मारहाण करण्यात आल्याचा आरोप महिलांनी केला आहे.**

त्याचे व्हिडीओदेखील सोशल मीडियावर व्हायरल झाले. या प्रकरणावरुन आता विरोधीपक्षाकडून टीका केली जात आहे. हा सगळा प्रकार म्हणजे दडपशाही असल्याचं विरोधक म्हणत आहे. यातच आता विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंनी (Ambadas danve) सरकारवर चांगलाच हल्लाबोल केला आहे. एक्सवर त्यांनी एक व्हिडीओ ट्वीट केला आहे. फडतूसपणा बंद करा, पुण्याच्या रस्त्यावरच दहशतीचे दर्शन होत असल्याचं ते म्हणाले आहेत. अंबादास दानवे यांनी ट्वीट करत पंतप्रधान मोदींवर देखील निशाणा साधला आहे. त्यांनी ट्वीटमध्ये लिहिलंय की, पंतप्रधान मोदी महिला सबळ करण्याच्या गप्पा करतात आणि त्यांचे भक्त हे महिलांना मारहाण करतात. गुंड केवळ मंत्रालयात नाहीत तर आता पुण्याच्या रस्त्यावरही दहशतीचे दर्शन घडवू लागले आहेत. गुन्हा दाखल करण्याचे काम झाले असेल, पण किती कार्यकर्त्यांना अटक झाली? हे सांगा.. फडतूसपणा बंद करा.. पत्रकार निखिल वागळे यांच्या गाडीवर हल्ला करीत असताना त्यांच्या संरक्षणासाठी सरसावलेल्या भक्ती कुंभार आणि इतर भगिनींना देखील भाजपाच्या गुंडांनी मारहाण केल्याचा व्हिडीओ आहे. अंबादास दानवे यांनी व्हिडीओ ट्वीट केला





आहे. त्यात वागळेंवर झालेल्या हल्ल्यात जखमी झालेली महिला दिसत आहे. या महिलेच्या अंगावर शाई उडलेली दिसत आहे. 'भाजपच्या युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांच्या घरात महिला नाही आहेत.

त्यांनी त्यांच्या आईच्या पोटी जन्म घेतलेला नाही आहे. या कार्यकर्त्यांनी विरोधक असलेल्या महिलांच्या अंगावर शाईफेक केली, दगडफेक केली. त्यासोबत पुरुषांनी काही महिलांचे कपडेदेखील फाडले. ही पुण्याची संस्कृती आहे का?छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची तुम्ही भाषणं करता. ती भाषणं फक्त देऊ नका तर ते भाषणं तुम्हीदेखील ऐका. देश नेमका कोणत्या मार्गाने पुढे जात आहे. जरा माणुसकीच्या नात्याने लोकांबरोबर वागा. पोलीस प्रशासनाला सगळ्या गोष्टी माहिती असूनही कोणी मदतीला पुढे आलं नाही. पोलिसांवरही गुन्हे दाखल व्हावे, अशी कळकळीची विनंती पोलीस अधिकाऱ्यांना करते. महिलांनी कुटुंबियांना नेमकी काय उत्तरं द्यायची. महिलांनी राजकारणात उतरायचं की नाही, असे अनेक आरोप शरद पवार गटातील महिला कार्यकर्त्यांनी केले आहेत. या प्रकरणावरुन आता विरोधीपक्षाकडून टीका केली जात आहे. हा सगळा प्रकार म्हणजे दडपशाही असल्याचं विरोधक म्हणत आहे. यातच आता विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवेंनी (Ambadas danve) सरकारवर चांगलाच हल्लाबोल केला आहे. एक्सवर त्यांनी एक व्हिडीओ ट्वीट केला आहे. फडतूसपणा बंद करा, पुण्याच्या रस्त्यावरच दहशतीचे दर्शन होत असल्याचं ते म्हणाले आहेत. अंबादास दानवे यांनी ट्वीट करत पंतप्रधान मोदींवर देखील निशाणा साधला आहे. त्यांनी ट्वीटमध्ये लिहिलंय की, पंतप्रधान मोदी महिला सबळ करण्याच्या गप्पा करतात आणि त्यांचे भक्त हे महिलांना मारहाण करतात. गुंड केवळ मंत्रालयात नाहीत तर आता पुण्याच्या रस्त्यावरही दहशतीचे दर्शन घडवू लागले आहेत. गुन्हा दाखल करण्याचे काम झाले असेल, पण किती कार्यकर्त्यांना अटक झाली? हे सांगा.. फडतूसपणा बंद करा.. पत्रकार निखिल वागळे यांच्या गाडीवर हल्ला करीत असताना त्यांच्या संरक्षणासाठी सरसावलेल्या भक्ती कुंभार आणि इतर भगिनींना देखील भाजपाच्या गुंडांनी मारहाण केल्याचा व्हिडीओ आहे. अंबादास दानवे यांनी व्हिडीओ ट्वीट केला आहे. त्यात वागळेंवर झालेल्या हल्ल्यात जखमी झालेली महिला दिसत आहे. या महिलेच्या अंगावर शाई उडलेली दिसत आहे.

### राजकारणात उतरायचं की नाही ?

'भाजपच्या युवा मोर्चाच्या कार्यकर्त्यांच्या घरात महिला नाही आहेत.. या कार्यकर्त्यांनी विरोधक असलेल्या महिलांच्या अंगावर शाईफेक केली, दगडफेक केली. त्यासोबत पुरुषांनी काही महिलांचे कपडेदेखील फाडले. ही पुण्याची संस्कृती आहे का?छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांची तुम्ही भाषणं करता. ती भाषणं फक्त देऊ नका तर ते भाषणं तुम्हीदेखील ऐका. देश नेमका कोणत्या मार्गाने पुढे जात आहे. जरा माणुसकीच्या नात्याने लोकांबरोबर वागा. पोलीस प्रशासनाला सगळ्या गोष्टी माहिती असूनही कोणी मदतीला पुढे आलं नाही. पोलिसांवरही गुन्हे दाखल व्हावे, अशी कळकळीची विनंती पोलीस अधिकाऱ्यांना करते. महिलांनी कुटुंबियांना नेमकी काय उत्तरं द्यायची. महिलांनी राजकारणात उतरायचं की नाही, असे अनेक आरोप शरद पवार गटातील महिला कार्यकर्त्यांनी केले आहेत.

# नवनियुक्त जिल्हाधिकारी दिवसे यांच्या नियुक्तीला आक्षेप

## केंद्रीय निवडणुक आयोगाकडे तक्रार,आम आदमी पक्षाने घेतली हरकत

।पुणे ।महाईन्यूज ।प्रतिनिधी।

**पुण्यामध्ये पुण्याच्या जिल्हाधिकारीपदी सुहास दिवसे यांची नुकतीच (७ फेब्रुवारी) नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर त्यांनी मावळते जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांच्याकडून जिल्हाधिकारी पदाचा कार्यभार स्वीकारला आहे. मात्र, दिवसे यांच्या नियुक्तीवर आम आदमी पक्षाने हरकत घेतली असून त्यांची नियुक्ती रद्द करण्याची मागणी थेट केंद्रीय निवडणूक आयोगाकडे केली आहे.**




गेल्या चार वर्षांपासून दिवसे हे पुण्यात महत्त्वाच्या पदावर कार्यरत आहेत. त्यामुळे निवडणुक आयोगाने लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बदल्यांसाठी जे नियम ठरवून दिले आहेत त्याचे उल्लंघन झाले आहे. त्यामुळे दिवसे यांची बदली रद्द करावी अशी मागणी आम आदमी पक्षाचे प्रदेश उपाध्यक्ष आणि सुराज्य संघर्ष समितीचे विजय कुंभार यांनी निवडणूक आयोगाकडे केली आहे. दिवसे यांच्या बदली बरोबर इतर काही वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या बदलीवर देखील आक्षेप घेण्यात आला आहे. या विरोधात देखील निवडणूक आयोगाकडे तक्रार करण्यात आली आहे. दिवसे हे जुलै २०२० ते ऑगस्ट २०२२ या कालावधीत पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (पीएमआरडीए) महानगर आयुक्त होते. त्यानंतर सप्टेंबर २०२२ ते ७ फेब्रुवारी २०२४ या कालावधीत पुण्यात राज्याचे क्रीडा आयुक्त म्हणून त्यांची नियुक्ती झाली होती. ७ फेब्रुवारीला पुण्याचे जिल्हाधिकारी म्हणून दिवसे यांची नियुक्ती झाली. तीन वर्ष किंवा त्यापेक्षा अधिक काळ जिल्ह्यामध्ये असलेल्या अधिकाऱ्यांची जिल्हा बाहेर बदली करण्यात यावी, असा नियम निवडणूक आयोगाने घालून दिला आहे.

### निवडणुकीशी संबंधित काम देण्यात येऊ नये

भविष्यात अशा अधिकाऱ्याकडे निवडणुकीशी संबंधित काम देण्यात येऊ नये, अशी अट आयोगाने घातलेली आहे. याच अटीचे उल्लंघन दिवसे यांची बदली करताना झाले आहे. दिवसे जवळपास चार वर्षे पुण्यात महत्त्वाच्या पदावर कार्यरत आहेत आणि आता त्यांच्याकडे जिल्हाधिकारी म्हणून पुण्यातील चार लोकसभा मतदारसंघाची जबाबदारी मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून असणार आहे. त्यामुळेच निवडणूक आयोगाकडे तक्रार केली असल्याचे कुंभार यांनी सांगितले.

दिवसे यांच्या बदलीने या नियमाचा भंग झाला आहे. किंवा निवडणूक आयोगाचा नियम डावलून दिवसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यातच दिवसे यांची नियुक्ती जिल्हाधिकारी पदावर झाल्याने तेच जिल्ह्याचे मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी असणार आहेत. दरम्यान, २१ डिसेंबर २०२३ रोजी केंद्रीय निवडणूक आयोगाने राज्य सरकारला पत्र लिहून लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बदलण्याचे निकष ठरवून दिले आहेत. त्यानुसार जिल्ह्यामध्ये तीन वर्षे किंवा त्यापेक्षा अधिक काळ असलेल्या अधिकाऱ्यांची जिल्ह्याबाहेर बदली करण्यात यावी, असे सांगण्यात आले आहे.

# चिखलीत 200 एमएलडी डब्लुटीपी प्लँट!

## आमदार महेश लांडगे यांचा पुढाकार : आयुक्त शेखर सिंह यांच्यासोबत कार्यवाहीबाबत बैठक

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चिखली येथील प्रस्तावित २०० एमएलडी जलशुद्धीकरण प्रकल्पाचे काम सुरू करण्यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिका प्रशासनाने कार्यवाही सुरू करावी. आगामी काळात होणारी लोकसंख्या वाढ आणि पाण्याची मागणी याचा विचार करुन प्रशासनाने तात्काळ अंमलबजावणी करावी, अशी मागणी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी केली आहे.**



याबाबत महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांच्या दालनामध्ये बैठक घेण्यात आली. यावेळी आमदार लांडगे यांनी या विषयावर सविस्तर चर्चा केली. आमदार लांडगे म्हणाले की, पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत १९९७ मध्ये समाविष्ट झालेल्या गावांमध्ये वाढलेली लोकसंख्या आणि पाण्याची गरज याचा विचार करता भामा आसखेड प्रकल्पांतर्गत चिखली येथे प्रस्तावित २०० एमएलडी जलशुद्धीकरण प्रकल्पाचे काम त्वरीत हाती घ्यावे, अशी सूचना आहे. शहराची लोकसंख्या सुमारे ३० लाखांच्या घरात आहे. चिखली, तळवडे, मोशी, चऱ्होली, दिघी, डुडूळगाव, जाधववाडी आदी गावांचा समावेश महापालिका हद्दीत झाला. मात्र २०१७ पर्यंत या गावांना पायाभूत सोयी-सुविधांपासून वंचित रहावे लागले आहे, असे आमदार लांडगे यांनी निवेदनात म्हटले आहे. यावर आयुक्त शेखर सिंह यांनी सदर कामाबाबत प्रशासनाकडून सकारात्मक भूमिकेतून कार्यवाही करण्यात येईल, असे आवश्वासन दिले आहे.

### पाणी पुरवठा सक्षमीकरण काळाची गरज : आमदार लांडगे

» वेगाने वाढणाऱ्या पिंपरी-चिंचवड शहरात पाणी पुरवठा सक्षम करणे काळाची गरज असून, त्यासाठी भाजपा सत्ताकाळात आंद्रा, भामा आसखेड प्रकल्पातून २६७ एमएलडी पाणी आरक्षित करण्यात आले. त्यापैकी १०० एमएलडी पाणी शहरात दाखल झाले आहे. परिणामी, शहरातील पाणी पुरवठा सुलभ होण्यास मदत होत आहे. शहरातील आगामी ४० वर्षांतील वाढत्या नागरिकरणाचा विचार करुन भामा आसखेड प्रकल्पाचे काम सुरू झाले आहे. आगामी दीड-दोन वर्षांमध्ये पाणी शहरात दाखल होईल. त्यासाठी चिखली येथे २०० एमएलडी क्षमतेचा जलशुद्धीकरण प्रकल्प प्रस्तावित आहे. यासाठी सल्लागाराची नियुक्ती केली असून, निविदा प्रक्रिया राबवावी आणि कामाला गती द्यावी, अशी मागणी आमदार लांडगे यांनी केली आहे.

---

# क्रीडा पुरस्कारर्थींना महापालिकेच्या मदतीची अपेक्षा!

## पद्मश्री मुरलीकांत पेटकर : "माझे शहर माझा अभिमान" या कार्यक्रम उत्साहात

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड शहरातील पद्मपुरस्कार, छत्रपती, अर्जुन अथवा क्रीडा पुरस्कारर्थींना महापालिकेकडून मोठ्या मदतीची अपेक्षा असल्याचे पद्मश्री मुरलीकांत पेटकर यांनी यावेळी सांगितले.**



पिंपरी चिंचवड पत्रकार संघाच्या वतीने "माझे शहर माझा अभिमान" या कार्यक्रमाचे आयोजन हॉटेल कलासागर कासारवाडी, पिंपरी येथे करण्यात आला यावेळी व्यासपीठावर आमदार उमाताई खापरे, उद्योजक संतोष बारणे, कामगार नेते यशवंत भोसले, बाळासाहेब ढसाळ, गोविंद वाकडे, नाना कांबळे, प्रविण शिर्के, प्रशांत साळुंखे, अर्चना मेंगडे आदी होते. या कार्यक्रमात शहरातील अनेक वकील, डॉक्टर, अभियंते, आर्क्रीटेक्ट, व उद्योजक उपस्थित होते. पद्मश्री पेटकर म्हणाले, अपंगांना ज्या पध्दतीने पेंशन आहे त्या पध्दतीने क्रीडा पुरस्कारर्थींना पेंशन योजना सुरू करावी. तसेच पिंपरी चिंचवड शहराला आयुक्त शेखर सिंह आल्यापासून शहराचा चांगल्या प्रकारे विकास झाला. कोरोना काळापासून आजपर्यंत कुठल्याही प्रकारचा मिळकतकर वाढवलेला नाही. आजही दिल्लीला बोर्डावर माझ्या नावाखाली पिंपरी चिंचवड लिहिलेले आहे असे पद्मश्री मुरलीकांत पेटकर यांनी सांगितले.

यावेळी बोलताना उद्योजक संतोष बारणे म्हणाले की, पिंपरी चिंचवड शहराचा हा विकास पाहता या शहराला अजूनही खूप मोठे भवितव्य आहे. यावेळी अभय भोर, अजिज शेख, कींडा शिक्षक पी.डी. पाटील, नारायण भागवत, गोविंद वाकडे, नाना कांबळे आदींची भाषणे झालीत कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बाळासाहेब ढसाळ होते.

### आयुक्त शेखर सिंहांची कामगिरी उल्लेखनीय...

**» यावेळी परीषदेचे स्वागताध्यक्ष कामगार नेते यशवंतभाऊ भोसले म्हणाले की, या शहरात हरणामसिंग यांच्या नंतर दुरदृष्टी असलेले शेखर सिंह हे या शहराला लाभले आहेत त्यांनी अनेक चांगली कामे केली आहेत जे चांगले झाले आहे त्याचे कौतुक झालेच पाहिजे. पिंपरी- चिंचवड शहरात माझ्या आजपर्यंतच्या काळात पिंपरी चिंचवड पत्रकार संघाने घेतलेल्या "माझे शहर माझा अभिमान" या उपक्रमा सारखा स्तुत्य उपक्रम मी पाहिला नाही.**

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रवीण शिर्के यांनी केले. सुत्रसंचालन माधुरी कोराड यांनी केले तर आभारप्रदर्शन विशाल जाधव यांनी मानले.




**ज्युलिएट रोमिओला म्हणते 'नावामध्ये एवढं विशेष आहे तरी काय ? समजा गुलाबाचं नाव दुसरंच काही असतं, तरी त्याचा सुगंध तर तेवढाच मधुर राहिला असता ना !' शेक्सपिअरने ज्युलिएटच्या मुखी टाकलेलं हे वाक्य जगप्रसिद्ध झालं. तरी पण नावातच फार काही आहे, हेही खरेच. नाहीतर एव्हरेस्ट शिखराचा शोध लागल्यावर त्याचे नाव जाहीर होण्यास तब्बल १६ वर्षे कशाला लागली असती ?**

# नावात काय नाही?



हिमालयातले 'ढीं'-15' हे शिखर सर्वोच्च असल्याचे राधानाथ सिकधर यांनी १८५२ मध्ये ट्रिग्नोमेट्रिक सर्व्हेचे प्रमुख कर्नल वॉ यांच्या निदर्शनाला आणले. हा एक क्रांतिकारक शोध ठरणार होता. म्हणूनच कर्नल वॉ यांनी स्वत:च सर्व नोंदी व गणिते तपासली. त्यात चार वर्षे गेली. या विलंबाचे अजून एक कारण होते. हे शिखर नेपाळ व तिबेट यांच्या सीमेवर आहे. परकीयांना तिबेट व नेपाळमध्ये प्रवेश नसल्याने त्या शिखराचे स्थानिक नाव समजत नव्हते. त्यासाठी १८५० ते १८५५ पर्यंत अथक प्रयत्न करण्यात येत होते. पण शिखराजवळ प्रवेश मिळवण्यात किंवा त्याचे स्थानिक नाव शोधण्यात यश येत नव्हते. अखेर त्याला नवे नाव देण्याचा निर्णय वॉ यांना घ्यावा लागला. त्यांनी १ मार्च १८५६ रोजी हा शोध प्रकट केला व त्या शिखरास जॉर्ज एव्हरेस्ट यांच्या कार्याच्या गौरवार्थ 'माऊंट एव्हरेस्ट' हे नाव सुचवले. १४ वर्षांपूर्वी निवृत्त झालेले जॉर्ज एव्हरेस्ट तेव्हा इंग्लंडमध्ये राहत होते आणि त्यांनी ते स्वत: शिखर कधी पाहिलेही नव्हते. त्यांचा असा कटाक्ष असे की भौगोलिक स्थळांना व्यक्तीऐवजी स्थानिक नावे देण्यात यावीत. अर्थातच या शिखराला आपले नाव देण्यास ते अनुकूल नव्हते आणि तसे त्यांनी रॉयल सोसायटीला लेखी कळवले. 'रॉयल जिओग्राफिकल सोसायटी'लाही हे नामकरण आवडले नाही. कारण कोणत्याही नैसर्गिक स्थानास व्यक्तीचे नाव न देता तेथील स्थानिक नाव देण्याचा रॉयल सोसायटीचाही आग्रह असे. या प्रकरणात जॉर्ज एव्हरेस्ट यांच्या थोरवीबद्दल कुणाचा आक्षेप नव्हता. १८१८ मध्ये १८ वर्षांच्या या बुद्धिमान तरुणाचे झपाटलेपण पाहून लॅम्ब्टन यांनी त्याला आपला सहकारी म्हणून घेतले. बुद्धिमत्ता व गुण यामुळे लॅम्ब्टननंतर त्यांचा कार्यभार २३ वर्षीय एव्हरेस्टकडे आला. लॅम्ब्टन यांनी सुरू केलेल्या त्रिकोणमितीय सर्व्हेचे रूपांतर एव्हरेस्ट यांनी भारतव्यापी व यशस्वी अशा 'ग्रेट आर्क' प्रकल्पात केले. मुळात लॅम्ब्टन यांचा 'आर्क प्रकल्प' कन्याकुमारी ते आग्र्यापर्यंत होता. पण त्यालाच हिमालयापर्यंत नेऊन एव्हरेस्टनी तो सर्वार्थाने 'ग्रेट आर्क' बनवला. सुमारे अडीच हजार कि.मी. लांबीच्या भारतातील 'मेरिडियन आर्क' चे अचूक मापन ही अजूनपर्यंतही जगातली अद्वितीय गोष्ट आहे. 'एव्हरेस्ट यांचे हे विज्ञातातील सर्वात मोठे योगदान असून या बाबतीत ते अतुलनीय आहेत', असे मोठमोठ्या संशोधकांचे मत आहे. त्यांनी विकसित केलेले 'एव्हरेस्ट स्फिरॉईड' हे प्रतिमान (मॉडेल) आजही भारतीय उपखंडातील अनेक देशांत वापरले जाते. सर्व्हेची थिओडोलाइट व इतर यंत्रे व तंत्रे यात मोठे व महत्त्वपूर्ण बदल करून त्यांनी ट्रिग्नोमेट्रिक सर्व्हेच्या कामात अधिक वेग, निर्दोषता व अचूकता आणली. भारतीय उपखंडात त्रिकोणमितीय सर्व्हे पूर्ण होऊन त्याआधारे नकाशे तयार होऊ लागले, याचे श्रेय एकमताने एव्हरेस्ट यांनाच दिले जाते. इंग्लंडच्या रेजिनाल्ड हेन्री फिलीमोर यांनी 'भारतीय ग्रेट आर्क' प्रकल्पाचा इतिहास पाच खंडांतून लिहिला आहे. त्यापैकी तिसरा पूर्ण खंड जॉर्ज एव्हरेस्ट यांच्या कार्यावर आहे. व्यक्तिश: जॉर्ज एव्हरेस्ट हे त्यांच्या अनेक सहकाऱ्यांचे प्रेरणास्थान होते. ग्रेट आर्क व त्रिकोणमितीय सर्व्हे हे जीवितकार्य मानून त्यासाठी त्यांनी सर्वस्व पणाला लावले. अतिश्रम व प्रतिकूलतेमुळे ते अनेकदा आजारी पडले. एकदा एक वर्ष तर एकदा चार वर्षे त्यांना सक्तीच्या विश्रांतीवर पाठवण्यात आले होते. एकदा तर सर्वांनी त्यांच्या जगण्याची आशाच सोडली होती. पण इच्छाशक्तीच्या आधारे एव्हरेस्टनी मृत्यूवर मात केली. 'जिवंत राहायचे असेल तर जंगल व सर्व्हेपासून दूर राहा' असे डॉक्टरांनी सांगितले होते. पण ते धुडकावून, थोडे बरे वाटताच 'नाऊ ऑर नेव्हर' असे म्हणत एव्हरेस्ट कामावर येत. १८४३ मध्ये निवृत्त होऊन एव्हरेस्ट इंग्लंडला परत गेले.

## संपादकीय »

### कडेकडेचे मध्यात..

***सुरुवातीला उद्योग-कारखाने गावाबाहेर असायचे. ते पाहण्यासाठी मुद्दाम गावाबाहेर जावे लागे. हळूहळू काळाच्या ओघात गावे मोठी होत गेली. पसरत गेली.***

सुरुवातीला उद्योग-कारखाने गावाबाहेर असायचे. ते पाहण्यासाठी मुद्दाम गावाबाहेर जावे लागे. हळूहळू काळाच्या ओघात गावे मोठी होत गेली. पसरत गेली. इतकी विस्तारली की जे गावाबाहेरचे होते ते असे गावात मध्यभागी येऊन ठाकले. जे कारखाने पाहायला गावाबाहेर जावे लागायचे ते गावाच्या मध्यभागी आले आणि मग अचानक सगळ्यांना कारखान्यांमुळे होणाऱ्या प्रदूषणाची चिंता वाटू लागली. वास्तविक कारखाने आधीही होते. तेव्हाही प्रदूषण करत होते. पण तेव्हा त्यांच्या प्रदूषणाचा इतका त्रास होत नसे. पण ते गावात आले आणि त्यांच्यामुळे होणारे प्रदूषण सर्वांस जाणवायला लागले. पूर्वीही राजकारणात गुन्हेगारी होती. पण गावकुसाबाहेर. काळाच्या ओघात राजकारणाचा पैस वाढत गेला. इतका की गावाबाहेरची गुन्हेगारी मग राजकारणाच्या मध्यभागी, अगदी पक्ष कार्यालयात मध्यभागी अशी येऊन बसली.

**गर्दीने ओथंबलेला जयपूर साहित्य महोत्सवातील सर्वात प्रशस्त 'फ्रण्ट लॉन' परिसर 'गुलजार साब' नामक सत्रात साक्षात गुलजारांचा शब्दोत्साह ऐकण्यासाठी कान एकवटून स्तब्ध झालेला. पैकी त्यांच्या फाळणीउत्तर दृश्य-काव्यांतील दाह जाणवत श्रोत्यांच्या डोळ्यांतूनही दाद येत होती.**

# जयपूरमधला 'सातांधळेपणाचा हत्ती'!



मग टागोरांच्या कवितेच्या जवळ जाण्याचा किस्सा सांगताना आपल्या वाचनारंभ काळातील आठवणीचा एक तुकडा गुलजारांनी सादर केला. आठवड्याला चार आणे दराने जासूसी उपन्यास वाचायला घेण्याची आणि त्या कादंबऱ्या एका रात्रीत संपवून दुसरी बदलण्याची खुमखुमी सांगताच लोकांनी त्यांच्या त्या वाक्यावर भरपूर हसून घेतले. समोर बसलेल्या 'रहस्यकथांना फालतू मानणाऱ्या सर्वपिढी'च्या वाचकवृंदासमोर गुलजार उर्दूतल्या शहजादा तबस्सुम आणि इरानी परवेज या लेखकांनी लावलेल्या गारुडाबद्दल सांगत होते. ज्यात बातमीदारांना किंवा गुलजारांच्या चाहत्यांनाही फारसे स्वारस्य दिसत नव्हते. पैकी शहजादा तबस्सुम हे नंतरच्या काळातही वाचकप्रिय झालेले नाव नाही. 'नीलम जासूस' नामक जुन्या नोव्हेंबर १९५९ सालातील मासिकात 'कोहे-तूर की चोरी' (कोहिनूरसारखाच हिरा असावा) या नावाने त्यांच्या जासूसी कादंबरीचे हिंदीत लिप्यांतर झाल्याचा दाखला सापडतो. पण इरानी परवेज हे नाव शोधूनही सापडत नाही. हे सत्र संपल्यानंतर 'मीडिया रूम'मधून गुलजार यांची बातमी आपापल्या वृत्तघरांत दाखल करण्यासाठी जी घाई लागलेली, त्यात सर्व हौशे-नवशे आणि जाणते गुलजारांनी बोलता बोलता दिलेल्या लक्षवेधू 'इण्ट्रो'चे आचमन करीत होते. 'पाकिस्तान मला शेजारच्या खोलीतील भिंतीइतका जवळ आहे, त्या भिंतीच्या खिडकीइतका समीप आहे.' हा मुद्दा ऑनलाइन फ्लॅश करण्यासाठी अभूतपूर्व घाई लागली होती. गुलजारांच्या रहस्यकथाप्रेमाचा मुद्दा त्यांच्या लेखी शून्यासमान होता. या रहस्यकथा देणाऱ्या माणसाने त्याच्या नुकसानाचा बदला म्हणून गुलजारांना दिलेल्या टागोरांच्या अनुवादित काव्यातून त्यांचे आयुष्य कसे बदलले, हा मुद्दाही नंतर कुणी छापून आलेल्या वृत्तात घेतला नाही. जयपूर साहित्य महोत्सवात तुम्हाला सापडणाऱ्या गोष्टी इतरांना सापडतीलच असे नाही. इतरांना काही तुमच्यापेक्षा अधिक चांगलेही सापडू शकण्याची शक्यता अधिक. त्यामुळे प्रत्येकासाठी हा महोत्सव 'सातांधळेपणाचा हत्ती'देखील होऊ शकतो. यंदाची आकर्षण केंद्रे भरपूर होती.

ख्रिस्तोफर नोलानचा 'ओपनहायमर' चित्रपट वर्षभर गाजत आहेच. वर ऑस्करसाठी सर्वाधिक नामांकने असताना आत्ता नव्या चर्वणात त्याचा लेखक काय बर्ड हादेखील प्रकाशझोतात आहे. त्यामुळे जयपूर महोत्सवात 'ओपनहायमर'चे चर्चासत्र आणि त्यानंतर पुस्तकाचे विक्रीसत्र अपेक्षेप्रमाणे झाले. आणखी एका चर्चासत्रात काय बर्ड यांनी पुस्तक आणि त्याची सिनेमा बनविण्याची प्रदीर्घ प्रक्रिया यांबद्दल सांगितले.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# मी जय श्रीराम नक्कीच म्हणेन!

## ओघवत्या काव्यात्मक शैलीत अमोल कोल्हेंनी केले भाषण

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राष्ट्रवादी काँग्रेसचे खासदार अमोल कोल्हे पुन्हा एकदा संसदेत कवितेच्या माध्यमातून बरसले आहेत. राम मंदिराच्या प्रस्तातावर आज चर्चा झाली. सर्वपक्षीय खासदारांनी राम मंदिराच्या मुद्द्यावर चर्चा केली. यावेळी डॉ. अमोल कोल्हे यांनीही त्यांचं मत मांडलं. ओघवत्या काव्यात्मक शैलीत अमोल कोल्हेंनी त्यांचं भाषण केलं. अवघ्या साडेसात मिनिटांच्या भाषणात त्यांनी पुन्हा एकदा जनतेची मने जिंकली आहेत.**



राम मंदिराचं निर्माण ही एक ऐतिहासिक घटना आहे. या घटनेत योगदान दिलेल्या प्रत्येक व्यक्तीचं मी अभिनंदन करेन. देशाची ही गौरवशाली परंपरा राहिली आहे की धर्मात राजकारण आणि राजकारणात धर्म आला नाही पाहिजे. कारण, जागतिक इतिहासानुसार धार्मिक कट्टरता राष्ट्राला नुकसान निर्माण करते. धार्मिक उदारता आणि वैश्विकता राष्ट्राला मानवतेच्या उंचीवर पोहोचवते. आणि मला हाच हिंदू धर्मातील उदारता, सहिष्णूता आणि वैश्विकतामुळे वंदनीय आहे”, असं अमोल कोल्हे सुरुवातीला उत्स्फूर्तपणे म्हणाले.“मी मराठी असल्याचा मला अभिमान आहे. मी त्या महाराष्ट्रातून येतो ज्या महाराष्ट्रात छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरा पगड जातींना एकत्र करून रयतेचं राज्य स्वराज्य निर्माण केलं. मी त्या महाराष्ट्रातून येतो, ज्या महाराष्ट्रात चंद्रभागेच्या तिरी अठरा पगड जातीच्या वारकऱ्यांचा, वैष्णवांचा मेळा जमतो. आणि तो एकाच पांडुरंगाच्या चरणी लीन येतो. मी त्या महाराष्ट्रातून येतो ज्या महाराष्ट्रातून महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, राजर्षी शाहू महाराज यांनी रुढीच्या, परंपरांच्या आणि कर्मकांडाच्या चौकटी झुगारून मानवतेला अधिष्ठान मिळवून दिलं”, असं अमोल कोल्हे भर संसदेत मराठी भाषेत बोलले.“राम मंदिर देशाच्या आस्थेचा विषय आहेत. भक्तीचा विषय आहेत. भक्तिमार्गात माध्यम, साधन आणि साध्य या तीन गोष्टींना फार महत्त्व असतं. पूजा, आरती हे माध्यम झालं. मूर्ती किंवा फोटो फ्रेम ठेवतो ते साधन झालं आणि परमात्म्याशी संवाद म्हणजे साध्य होय. त्यामुळे राम मंदिर साध्य नाही, साधन आहे. त्यामुळे मर्यादा पुरुषोत्तम प्रभू रामचंद्रांच्या आदर्शांचं आपल्या जीवनात अनुसरण करणं, आणि आचरण करणं हे साध्य होईल. प्रभू राम एकवचनी आणि एकपत्नी होते. एकवचनी प्रभू श्रीरामांचे आपण भक्त म्हणवतो, मग देशात २ कोटी रोजगार निर्माण करू या आश्वासनाचं काय झालं? शेतकऱ्यांचं उत्पन्न दुप्पट वाढवू या आश्वासनाचं काय झालं? २०२२ पर्यंत प्रत्येकाला पक्की घरे मिळतील या वचनांचं काय झालं, याचा अंतःपूर्ण विचार करावा लागेल”, असं म्हणत अमोल कोल्हेंनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली.“भगवान श्रीराम समान न्याय देणारे होते. परंतु, कलियुगात विरोधकांवर ईडीसारख्या यंत्रणांचा ससेमिरा लावला जातो. परंतु, हेच जेव्हा सत्ताधाऱ्यांमध्ये सामील होतात तेव्हा त्यांच्यावरील आरोप पुसले जातात. हा समान न्याय आहे का?”, असा सवालही त्यांनी उपस्थित केला.“मी नारायण गावातून येतो.

### गाय आणि घरातील माय सुरक्षित

» हे गाव तमाशा पंढरी म्हणून ओळखलं जातं. तमाशा हे लोकनाट्य असून महाराष्ट्राची मोठी परंपरा आहे. तमाशात वगनाट्य होतात. हे वगनाट्य व्यंगात्मक रुपातून होतं. व्यंगात्मक दृष्टीने वगनाट्य लिहिणाऱ्या आमच्या येथील एका लेखकाने कलियुगातील रामायण लिहिलं आहे, असं अमोल कोल्हे म्हणाले.कलियुगातील रामायणाविषयी अमोल कोल्हे म्हणाले, रामायणात कांचनमृगाचं आमिष दाखवून सीतेचं अपहरण केलं होतं, कलियुगात ईडी, सीबीआयचा धाक दाखवून निवडणूक चिन्ह, पक्ष आणि नेत्यांचं हरण होतं. सीता माता अशोकवन रडत होती, पण कलियुगात लोकशाही रडत आहे. मी विचारलं मग यावर उपाय काय? तर रामायणात हनुमानाने समुद्र पार करून सीता मातेला रामाची अंगठी दिली होती. आणि सीता मातेचं धाडस उंचावलं होतं. आजही तेच होऊ शकतं. ते म्हणाले त्या हनुमानाकडून प्रेरणा देऊन सामान्य जनतेला खोट्या प्रोपागंडाचा समुद्र पार करून मतदानाची अंगठी द्यावी लागेल आणि लोकशाहीचं धाडस बांधावं लागेल”, अशी कहाणी अमोल कोल्हेंनी सांगितली.“कलियुगात एक असं आदर्श उदाहरण आहे ज्यांनी माणूस धर्मासाठी नाही तर धर्म माणसासाठी तयार झाला आहे, हे सिद्ध केलं आहे. ते आदर्श आहेत छत्रपती शिवाजी महाराज. त्यामुळे मी जय श्रीराम नक्कीच म्हणेन, पण त्याआधी जय शिवराय म्हणेन. कारण छत्रपती शिवाजी महाराजच होते, ज्यांच्यामुळे अंगणातील तुळस, गोठ्यातील गाय आणि घरातील माय सुरक्षित राहिली.

# हात फ्रॅक्चर झाल्याने सोडावा लागला होता खेळ!

## बॅडमिंटन या एका खेळावर माझं नितांत प्रेम आहे : राज ठाकरे

। मुंबई । प्रतिनिधी : महाईन्यूज

**महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज पुण्यात बॅडमिंटन खेळाडूंसमोर मजेशीर भाषण केलं. यावेळी त्यांनी त्यांच्या जुन्या दिवसांची आठवण काढली. तसंच, याबरोबर त्यांनी राजकीय फटकेबाजीही केली आहे. “मला एका गोष्टीचं नवल वाटतं की हातात काही द्यायचं नाही आणि अपेक्षा माझ्याकडून ठेवायच्या. एकदा का हातामध्ये सगळं द्या, मग बघा मी कसं सगळं हाणतो”, असं उपहासात्मक राज ठाकरे यांनी टीप्पणी केली.**



“बॅडमिंटन या एका खेळावर माझं नितांत प्रेम आहे. १५-२० वर्षे मी बॅडमिंटन खेळलो. व्यसन असावं तसं मी बॅडमिंटन खेळलो आहे. सकाळी सहा-साडेसात वाजता जायचो आणि रात्री ११-१२ ला जेवायच्या वेळेला मी यायचो. बॅडमिंटन सोडलं आणि टेनिस सुरू केलं. एकदा आजारपणात विकनेस आला होता, तेव्हा मी पडलो आणि हात फ्रॅक्चर झाला. हाताचं फ्रॅक्चर बरं झालं, पण कमरेच्या इथे दुखायला लागलं”, असंही राज ठाकरे म्हणाले.ते पुढे म्हणाले, हिप रिप्लेसमेंट केल्यानंतर वजन वाढलं. दीड – पावणे दोन वर्षे व्यायाम वगैरे काही नव्हतं. त्यामुळे टेनिस सुटलं. पण आता टेनिस सुरू झालेलं आहे. पुण्यात बॅडमिंटनसाठी जे जे करता येईल, ते मी महाराष्ट्रासाठी आणि पुण्यासाठी नक्की करेन. कारण तो जिव्हाळ्याचा विषय आहे. पण पुण्यात सध्या काय गेम सुरू आहे माहीत नाही मला”, असंही राज ठाकरे म्हणाले. गेम चालू कारण दिसली जमीन की विक हे एकमेव धोरण घेऊन पुढे जातात हे बॅडमिंटनचं कोर्ट दाखवलं तर एवढी जमीन मोकळी का, असं ते विचारू शकतात.

### बॅडमिंटन खेळावर माझं नितांत प्रेम

» बॅडमिंटनपेक्षा कॅरम का खेळत नाही हे ते विचारू शकतात?” असाही उपहासात्मक टोला त्यांनी लगावला.“मी पुण्यात जन्माला आलो असतो तर मी बॅडमिंटन खेळलो असतो. मुंबईत क्रिकेटचं खूप काही आहे. मी ज्या शिवाजी पार्कला राहतो त्याच्या एका लेनवर पाच टेनिस कोर्ट्स आहेत. पण मला समजत नाही की आम्हाला बॅडमिंटन खेळायला का प्रवृत्त केलं नाही? मी बॅडमिंटन खेळायला लागलो तेव्हा मला वाटलं की इतकी वर्षे हा खेळ का खेळलो नाही”, अशी खंतही त्यांनी बोलून दाखवली. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आज पुण्यात बॅडमिंटन खेळाडूंसमोर मजेशीर भाषण केलं. यावेळी त्यांनी त्यांच्या जुन्या दिवसांची आठवण काढली. तसंच, याबरोबर त्यांनी राजकीय फटकेबाजीही केली आहे. “बॅडमिंटन या एका खेळावर माझं नितांत प्रेम आहे.

# सरकारची पाच वर्षे देशात सुधारणा

## कामगिरी आणि परिवर्तनाची राहिली; पीएम मोदींचे प्रतिपादन

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**लोकसभेच्या सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शनिवारी (10 फेब्रुवारी) अयोध्येतील राम मंदिराच्या उभारणीवर चर्चा झाली. या चर्चेत पंतप्रधान नरेंद्र मोदीही सहभागी झाले. यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, सरकारची पाच वर्षे देशात सुधारणा, कामगिरी आणि परिवर्तनाची राहिली आहेत. 17 व्या लोकसभेला देश आशीर्वाद देईल. पीएम मोदी म्हणाले, "गेल्या 5 वर्षात देशसेवेत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. लोकसभेत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. आजचा दिवस अतिशय महत्त्वाचा आहे. आज देश नवा आत्मविश्वास अनुभवत आहे. सुधारणा , परिवर्तन करा आणि पाच वर्षांत करा, काम केले जात आहे.**



ते म्हणाले की, सुधारणा आणि कामगिरी या दोन्ही गोष्टी क्वचितच घडतात आणि तो बदल आपण डोळ्यांसमोर पाहू शकतो. 17 व्या लोकसभेच्या माध्यमातून देश याचा अनुभव घेत आहे आणि 17 व्या लोकसभेवर देशाचा आशीर्वाद कायम राहील, असा माझा ठाम विश्वास आहे.पंतप्रधान म्हणाले की, 17 व्या लोकसभेने नवे मानदंड निर्माण केले आहेत. या काळात आपल्या राज्यघटनेच्या अंमलबजावणीला 75 वर्षे पूर्ण झाली. या कार्यकाळात अनेक सुधारणा झाल्या. गेम चेंजर 21 व्या शतकाचा भक्कम पाया त्या सर्व गोष्टींमध्ये दिसून येतो. आम्ही एका मोठ्या बदलाकडे वेगाने पुढे निघालो आहोत. ते म्हणाले की, "अनेक पिढ्यांनी संविधानाचे स्वप्न पाहिले होते, परंतु प्रत्येक क्षणाला अडथळा येत होता. मात्र, या सभागृहाने कलम 370 हटवून राज्यघटनेचे पूर्ण स्वरूप प्रकट केले. ज्या महापुरुषांनी राज्यघटना घडवली त्यांच्या आत्मा आशीर्वाद देत असेल." पंतप्रधान म्हणाले की, "या 5 वर्षांत मानवजातीने शतकातील सर्वात मोठ्या संकटाचा सामना केला आहे; कोण वाचेल, कोण नाही, कोणी कोणाला वाचवू शकेल की नाही. घरातून बाहेर पडणेही कठीण झाले आहे. त्यानंतर संसद बसली, अध्यक्षांनी देशाला संबोधित केले. कामकाज थांबू दिले नाही.पंतप्रधान म्हणाले, "तुम्ही ( लोकसभा सभापती) संसदेच्या ग्रंथालयाची दारे सर्वसामान्यांसाठी खुली केली. हा ज्ञानाचा खजिना, परंपरांचा हा वारसा सर्वसामान्यांसाठी खुला करून तुम्ही मोठी सेवा केली आहे. मी त्यांचे आभार व्यक्त करतो. ते म्हणाले, "या कार्यकाळात अनेक सुधारणा झाल्या आहेत. 21व्या शतकातील भारताचा भक्कम पाया त्या सर्व गोष्टींमध्ये दिसत आहे. देश बदलाच्या दिशेने वेगाने पुढे गेला आहे आणि सभागृहातील सर्व सहकाऱ्यांनी आपली भूमिका बजावली आहे. "पंतप्रधान सभागृहात म्हणाले, "भारताला G20 चे अध्यक्षपद भूषवण्याची संधी मिळाली आणि भारताला मोठा सन्मान मिळाला. देशातील प्रत्येक राज्याने भारताची क्षमता आणि त्याची ओळख जगासमोर मांडली. त्याचा प्रभाव जगावर अजूनही आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांना सांगितले की, "तुम्ही नेहमी हसतमुख असता. तुमचे हास्य कधीच फिके पडले नाही. तुम्ही या सभागृहाला अनेक प्रसंगी संतुलित आणि न्याय्य पद्धतीने मार्गदर्शन केले आहे, यासाठी मी तुमचे कौतुक करतो. राग, आरोप-प्रत्यारोपाचे क्षण होते. उलट-सुलट आरोप पण तुम्ही संयमाने परिस्थिती नियंत्रणात आणली आणि सभागृह चालवले.पंतप्रधान म्हणाले की, 17 व्या लोकसभेने नवे मानदंड निर्माण केले आहेत. या काळात आपल्या राज्यघटनेच्या अंमलबजावणीला 75 वर्षे पूर्ण झाली. या कार्यकाळात अनेक सुधारणा झाल्या. गेम चेंजर 21 व्या शतकाचा भक्कम पाया त्या सर्व गोष्टींमध्ये दिसून येतो. आम्ही एका मोठ्या बदलाकडे वेगाने पुढे निघालो आहोत. ते म्हणाले की, "अनेक पिढ्यांनी संविधानाचे स्वप्न पाहिले होते, परंतु प्रत्येक क्षणाला अडथळा येत होता. मात्र, या सभागृहाने कलम 370 हटवून राज्यघटनेचे पूर्ण स्वरूप प्रकट केले. ज्या महापुरुषांनी राज्यघटना घडवली त्यांच्या आत्मा आशीर्वाद देत असेल." पंतप्रधान म्हणाले की, "या 5 वर्षांत मानवजातीने शतकातील सर्वात मोठ्या संकटाचा सामना केला आहे; कोण वाचेल, कोण नाही, कोणी कोणाला वाचवू शकेल की नाही. घरातून बाहेर पडणेही कठीण झाले आहे. त्यानंतर संसद बसली, अध्यक्षांनी देशाला संबोधित केले. कामकाज थांबू दिले नाही.

### लोकसभेत अनेक महत्त्वाचे निर्णय

पंतप्रधान म्हणाले, "तुम्ही ( लोकसभा सभापती) संसदेच्या ग्रंथालयाची दारे सर्वसामान्यांसाठी खुली केली. हा ज्ञानाचा खजिना, परंपरांचा हा वारसा सर्वसामान्यांसाठी खुला करून तुम्ही मोठी सेवा केली आहे. मी त्यांचे आभार व्यक्त करतो. ते म्हणाले, "या कार्यकाळात अनेक सुधारणा झाल्या आहेत. 21व्या शतकातील भारताचा भक्कम पाया त्या सर्व गोष्टींमध्ये दिसत आहे. देश बदलाच्या दिशेने वेगाने पुढे गेला आहे आणि सभागृहातील सर्व सहकाऱ्यांनी आपली भूमिका बजावली आहे. "पंतप्रधान सभागृहात म्हणाले, "भारताला G20 चे अध्यक्षपद भूषवण्याची संधी मिळाली आणि भारताला मोठा सन्मान मिळाला. देशातील प्रत्येक राज्याने भारताची क्षमता आणि त्याची ओळख जगासमोर मांडली. लोकसभेच्या सध्या सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात शनिवारी (10 फेब्रुवारी) अयोध्येतील राम मंदिराच्या उभारणीवर चर्चा झाली. या चर्चेत पंतप्रधान नरेंद्र मोदीही सहभागी झाले. यावेळी पंतप्रधान मोदी म्हणाले की, सरकारची पाच वर्षे देशात सुधारणा, कामगिरी आणि परिवर्तनाची राहिली आहेत. 17 व्या लोकसभेला देश आशीर्वाद देईल. पीएम मोदी म्हणाले, "गेल्या 5 वर्षात देशसेवेत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत. लोकसभेत अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले आहेत.

# टाटापाठोपाठ आता महिंद्रा ग्रुपही बनवणार विमान!

## भारतीय हवाई दलाला मीडियम ट्रान्सपोर्ट एअरक्राफ्टची गरज

। नवी दिल्ली ।

**वृत्तसंस्था : महाईन्यूज**

**ऑटो क्षेत्रातील दिग्गज कंपनी महिंद्रा समूहाने ब्राझिलियन कंपनी एम्ब्रेरच्या सहकार्याने C-390 मिलेनियम विमान तयार करण्याची घोषणा केली आहे. दोन्ही कंपन्यांनी हवाई दलाच्या गरजेनुसार ते तयार करण्याचे मान्य केले आहे. महिंद्रा ग्रुपचे चेअरमन आनंद महिंद्रा यांनीही सोशल मीडियावर पोस्ट करत या कराराच्या संदर्भातील माहिती दिली आहे.**



भारतीय हवाई दलाला मीडियम ट्रान्सपोर्ट एअरक्राफ्टची (एमटीए) गरज भासत होती. त्यामुळं ऑटो क्षेत्रातील दिग्गज महिंद्रा समूहाने ब्राझिलियन कंपनी एम्ब्रेरच्या सहकार्याने C 390 मिलेनियम विमान तयार करण्याची घोषणा केलीय. हवाई दल 18 ते 30 टन वजन उचलण्यास सक्षम MTA शोधत आहे. एम्ब्रेरने फेब्रुवारीमध्ये बंगळुरुमध्ये हे C-390 मिलेनियम मल्टी मिशन टॅक्टिकल एअर ट्रान्सपोर्ट प्रदर्शित केले होते. एम्ब्रेअर या विमानाबाबत महिंद्रा आणि टाटा समूहाशी चर्चा करत होते. पण, शुक्रवारी महिंद्राने पुढाकार घेत हा करार जाहीर केला. दोन्ही कंपन्यांमध्ये सामंजस्य करार झाला आहे.जगातील तिसरी सर्वात मोठी पॅसेंजर जेट उत्पादक एम्ब्रेर डिफेन्स अँड सिक्युरिटी आणि महिंद्रा डिफेन्स सिस्टिम्स या करारावर एकत्र काम करतील. आनंद महिंद्रा यांनी ट्विट करत याबाबतची माहिती दिली आहे. या डीलमुळं खूप आनंद झाला आहे. त्याच्या मदतीने आम्ही भारतीय हवाई दलाच्या गरजा पूर्ण करू शकू. हवाई दल एमटीएसाठी लवकरच निविदा काढणार आहे. आमचा संयुक्त उपक्रमही यात सहभागी होणार असल्याचे आनंद महिंद्रा यांनी सांगितलं.अलीकडेच टाटा समूहाने H125 सिंगल इंजिन हेलिकॉप्टर तयार करण्यासाठी विमान उत्पादक कंपनी एअरबससोबत करार केला होता. करारानुसार, 40 C295 वाहतूक विमाने वडोदरा येथील असेंबली लाईनमध्ये तयार केली जातील.

### टाटा समहूचा एअरबससोबत करार

टाटा सन्सचे चेअरमन एन चंद्रशेखरन म्हणाले होते की, येथे उत्पादित H125 हेलिकॉप्टर देखील निर्यात केले जातील. सध्या भारतात अशा 800 हेलिकॉप्टरची तात्काळ मागणी आहे. C-390 चा वापर ब्राझीलच्या हवाई दलाकडून केला जातो. यानंतर, पोर्तुगाल, हंगेरी, नेदरलँड, ऑस्ट्रिया, झेक प्रजासत्ताक आणि दक्षिण कोरियाच्या सैन्याने देखील ते खरेदी केले. एम्ब्रेरने यापूर्वी DRDO, BSF आणि भारत सरकारला विविध प्रकारची विमाने दिली आहेत.एम्ब्रेर सी-390 मिलेनियम हे एक मध्यम आकाराचे, दुहेरी-इंजिन , जेट-शक्तीवर चालणारे लष्करी वाहतूक विमान आहे. हे विमान ब्राझिलियन एरोस्पेस उत्पादक एम्ब्रेरने डिझाइन आणि तयार केले आहे.

# 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया'; प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद!



शाहीद कपूर आणि क्रिती सेनॉन यांच्या मुख्य भूमिका असलेला 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' हा चित्रपट शुक्रवारी प्रेक्षकांच्या भेटीला आला. या चित्रपटाला प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळतोय. हा रोमँटिक ड्रामा चित्रपट पाहण्यासाठी प्रेक्षकांची गर्दी पाहायला मिळत आहे. या चित्रपटात एका मराठी अभिनेत्रीने काम केलं आहे. तिने स्वतः याबद्दल पोस्ट शेअर करून माहिती दिली आहे.'चला हवा येऊ द्या' फेम स्नेहल शिदम 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' या चित्रपटात झळकली आहे. तिने शाहीद कपूरबरोबर स्क्रीन शेअर केली आहे. चित्रपटात तिचे शाहीदबरोबर सीन आहेत. "कळवायला उशीर आणि आनंद दोन्ही होतोय. शाहीद कपूर आणि क्रिती सेनॉन यांचा नवीन हिंदी सिनेमा "तेरी बातो में ऐसा उलझा जिया" नुकताच प्रदर्शित झाला आहे. यात माझी एक छोटीशी भूमिका आहे. तुमच्या जवळच्या चित्रपटगृहात जाऊन सिनेमा नक्की बघा आणि कसा वाटतोय ते सांगा. तुमचं प्रेम आणि आशीर्वाद असेच राहुद्या," असं स्नेहलने इन्स्टाग्रामवर शाहीदबरोबरचा फोटो शेअर करत लिहिलं आहे.'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' हा चित्रपट पाहणाऱ्या अनेक प्रेक्षकांना मराठमोळ्या स्नेहल शिदमला पडद्यावर पाहून आश्चर्याचा धक्का बसला आहे. अनेकांनी सोशल मीडियावर स्नेहलचे व्हिडीओ शेअर केले आहेत. स्नेहलचा हा पहिलाच चित्रपट आहे. पहिल्याच चित्रपटात शाहीद कपूरबरोबर स्क्रीन शेअर करणाऱ्या स्नेहलचं चाहते खूप कौतुक करत आहेत. तिने शेअर केलेल्या पोस्टवर कमेंट करून तिला चाहते व अभिनयक्षेत्रातील लोक शुभेच्छा देत आहेत.दरम्यान, शाहीद कपूरच्या चित्रपटात मराठी कलाकार झळकण्याची ही पहिलीच वेळ नाही.

# आमिरच्या चित्रपटात झळकणार जिनिलीया

आमिर खानच्या 'लाल सिंग चड्ढा' या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर अत्यंत निराशजनक कामगिरी केली होती. खरंतर, आमिरला बॉलीवूडचा मिस्टर परफेक्शनिस्ट म्हणून ओळखलं जातं. त्यामुळे अशा दमदार अभिनेत्याचे सलग चित्रपट फ्लॉप होणं हे आमिरसह त्याच्या चाहत्यांसाठी धक्कादायक होतं. 'लाल सिंग चड्ढा' फ्लॉप झाल्यावर त्याने अभिनयातून काही काळ ब्रेक घ्यायचं ठरवलं. परंतु, आता लवकरच आमिर पुन्हा एकदा प्रेक्षकांसह चाहत्यांचं मनोरंजन करण्यासाठी मोठ्या पडद्यावर पुनरागमन करणार आहे.आमिर बहुचर्चित 'सितारे जमीन पर' चित्रपटातून पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. हा चित्रपट 'कॅम्पिओन्स'चा हिंदी रिमेक असणार आहे. या चित्रपटासाठी आमिरने सर्वात आधी फरहान अख्तरला नायकाच्या भूमिकेसाठी ऑफर दिली होती पण, त्यानंतर अभिनेत्याने ही भूमिका स्वतः साकारण्याचा निर्णय घेतला. 'सितारे जमीन पर'चं दिग्दर्शन आरएस प्रसन्ना यांनी केलं आहे. आता या चित्रपटात झळकणाऱ्या नायिकेचं नावंही समोर आलं आहे.पिंकव्हिलाने दिलेल्या रिपोर्टनुसार, अभिनेत्री जिनिलीया देशमुखने आमिर खानचा आगामी चित्रपट 'सितारे जमीन पर' साइन केला आहे. याशिवाय अभिनेत्रीने यासंदर्भात माहिती देणारी एक इन्स्टाग्राम स्टोरी देखील शेअर केली आहे. या स्टोरीमध्ये आमिर खानच्या प्रोडक्शन हाऊसची बॉटल पाहायला मिळत आहे. या फोटोला जिनिलीयाने "१६ वर्षांनंतर..." असं कॅप्शन दिलं आहे. यापूर्वी अभिनेत्रीने आमिरची निर्मिती असलेल्या 'जाने तू या जाने ना' चित्रपटासाठी काम केलं होतं. यामध्ये अभिनेत्याचा भाचा इम्रान खानने प्रमुख भूमिका साकारली होती.दरम्यान, 'सितारे जमीन पर' चित्रपटात आमिर खान, जिनिलीया देशमुखसह 'तारे जमीन पर' फेम दर्शील प्रमुख भूमिकेत झळकणार आहे. आता आमिर या चित्रपटासंदर्भात पुढील अपडेट्स केव्हा देणार याबाबत त्याच्या चाहत्यांच्या मनात उत्सुकता निर्माण झाली आहे.



# मोठा झाल्यावर तैमूर काय बनणार?

अभिनेता सैफ अली खान आणि करीना कपूरप्रमाणेच त्यांचा मोठा मुलगा तैमूर अली खान नेहमीच चर्चेत असतो. तैमूर लोकप्रिय स्टारकिड्सपैकी एक आहे. सोशल मीडियावर तैमूरचे अनेक फोटो व व्हिडीओ व्हायरल होत असतात. त्याचा एक फोटो घेण्यासाठी पापसाझींमध्ये चढाओढ होताना दिसते. चाहत्यांकडूनही तैमूरच्या फोटोंना मोठ्या प्रमाणात पसंती मिळत असते. तैमूरबाबात छोट्या मोठ्या गोष्टी जाणून घेण्यास चाहते मोठ्या प्रमाणात उत्सुक असतात. मोठा झाल्यावर तैमूर आई-बाबासारखाच अभिनय क्षेत्रात येणार का अनेकदा असा प्रश्न विचारला जातो. दरम्यान एका मुलाखतीत सैफ अली खान व करीनाने याबाबतचा खुलासा केला आहे. सैफ म्हणाला, तैमूला अभिनेता बनण्यात कोणताही रस नाही. त्याला फूटबॉल खेळाडू बनायचे आहे. त्यासाठी त्याला अर्जेटीनाला जायचे आहे. तर करीना म्हणाली, त्याला गिटारिस्ट ही बनण्याची इच्छा आहे. तसेच त्याला मेस्सीसारखा प्रसिद्ध फूटबॉलपटूही बनायचे आहे.

# धर्मेंद्र यांनी केला नावात बदल

बॉलीवूडमधील ज्येष्ठ अभिनेते म्हणून धर्मेंद्र यांना ओळखले जाते. ७० च्या दशकात त्यांनी अनेक सुपरहिट चित्रपटांमध्ये काम केले. आतापर्यंत त्यांनी तब्बल ३०० चित्रपटांमध्ये वेगवेगळ्या धाटणीच्या भूमिका साकारल्या आहेत. धर्मेंद्र यांचे संपूर्ण नाव धर्मेंद्र सिंह देओल आहे. मात्र, त्यांनी कधीच आपले पूर्ण नाव वापरले नाही. त्यांनी नेहमीच धर्मेंद्र हे पहिलेच नाव सगळीकडे वापरले. मात्र, आता तब्बल ६४ वर्षांनी त्यांनी आपल्या नावामध्ये बदल केला आहे. नुकताच शाहिद कपूर आणि क्रिती सेनॉन यांचा 'तेरी बातों में ऐसा उलझा जिया' चित्रपट प्रदर्शित झाला.



# 'रामायण' चित्रपटात रकुल शूर्पणखाच्या भूमिकेत

गेल्या काही महिन्यांपासून रामायणावर आधारित 'रामायण' या चित्रपटाची चर्चा सुरू आहे. नितेश तिवारी दिग्दर्शित 'रामायण' या चित्रपटात अभिनेता रणबीर कपूर प्रभू श्रीरामाच्या भूमिकेसाठी निश्चित झाला आहे. तर सीतेच्या भूमिकेसाठी जान्हवी कपूर व दाक्षिणात्य अभिनेत्री साई पल्लवी यांच्या नावाची चर्चा सुरू आहे. पण अजूनपर्यंत सीतेच्या भूमिकेसाठी अभिनेत्री ठरलेली नाही. अशातच शूर्पणखाची भूमिका कोणती बॉलीवूड अभिनेत्री साकारणार हे समोर आलं आहे.नितेश तिवारी दिग्दर्शित 'रामायण' चित्रपटात शूर्पणखाच्या भूमिकेसाठी अभिनेत्री रकुल प्रीत सिंगच्या नावाची चर्चा सुरू आहे. 'पिंकविला'च्या वृत्तानुसार, रकुल प्रीत सिंग शूर्पणखाच्या भूमिकेत पाहायला मिळू शकते. याविषयी चित्रपट निर्मात्यांमध्ये चर्चा झाली आहे. पण निर्मात्यांनी स्वतः याबाबत अधिकृतरित्या घोषणा केली नाहीये. त्यामुळे रकुल प्रीत सिंग शूर्पणखाच्या भूमिकेत पाहायला मिळणार, या अधिकृत घोषणेची चाहते आतुरतेने वाट पाहत आहेत. माहितीनुसार, शूर्पणखा भूमिकेसाठी रकुलची टेस्ट पूर्ण झाली आहे. जर रकुलचं ही भूमिका साकारणार असल्याचं निश्चित झालं तर मग जॅकी भगनानीशी लग्न केल्यानंतरचा 'रामायण' हा तिचा पहिला चित्रपट असेल.दरम्यान, अभिनेत्री रकुल प्रीत सिंग जॅकी भगनानीबरोबर २१ फेब्रुवारीला लग्नबंधनात अडकणार असल्याचं म्हटलं जात आहे. गोव्यात मोठ्या थाटामाटात दोघांचं लग्नसोहळा असणार आहे. पण हे आता कितपती खरं आहे? हे येत्या काळात समजेल.

# तीन सामन्यांसाठी भारतीय संघाची घोषणा

## दोन दिग्गजांचं पुनरागमन, दुखापतीमुळे श्रेयस संघाबाहेर

नवी दिल्ली ।
। वृत्तसंस्था

**अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर अखेर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतील उर्वरित तीन सामन्यांसाठी भारतीय संघाची घोषणा केली आहे. याद्वारे गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या मुद्द्यावर अखेर पडदा पडला आहे. भारताचा स्टार फलंदाज विराट कोहली हा इंग्लंडविरुद्धच्या उर्वरित तिन्ही कसोटी सामन्यांमध्ये खेळणार नसल्याचं स्पष्ट झालं आहे. त्याचबरोबर दुखापतीमुळे श्रेयस अय्यरला भारतीय संघातून वगळण्यात आलं आहे. यासह भारतीय क्रिकेटरसिकांना एका बातमीने दिलासा दिला आहे.**




ती बातमी म्हणजे मधल्या फळीतील भरवशाचा फलंदाज लोकेश राहुल आणि अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाचं संघात पुनरागमन झालं आहे. परंतु, बीसीसीआयने स्पष्ट केलं आहे की हे दोन्ही खेळाडू फिटनेस टेस्टमध्ये पास झाले तरच त्यांचा अंतिम ११ जणांच्या संघात समावेश केला जाऊ शकतो.भारताच्या वरिष्ठ निवड समितीने शुक्रवारी (९ फेब्रुवारी) महत्त्वाची बैठक बोलावली होती. या बैठकीत इंग्लंडविरुद्धच्या उर्वरित तीन कसोटी सामन्यांसाठी भारतीय संघाची निवड करण्यात आली. आज सकाळी या संघाची घोषणा करण्यात आली. निवड समितीने संघात फार मोठे फेरबदल केलेले नाहीत. केवळ आकाश दीप या नव्या खेळाडूचा भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे. विराट आणि श्रेयसचा संघात समावेश न केल्यामुळे सरफराज खान आणि रजत पाटीदारच्या संघातील स्थानाला धक्का लागलेला नाही. दुसऱ्या बाजूला, भारतीय क्रिकेटरसिकांना विराटला पांढऱ्या जर्सीत पाहण्यासाठी आणखी काही दिवस वाट पाहावी लागणार आहे. कारण,इं ग्लंडविरुद्धच्या मालिकेत तो खेळणार नाही. विराटने त्याच्या अनुपस्थितीबाबत संघ व्यवस्थापनाला आणि निवड समितीला कळवलं आहे. वैयक्तिक कारणांमुळे तो या मालिकेत खेळू शकणार नाही. त्यामुळे पदार्पणानंतर पहिल्यांदाच विराट कोहली घरच्या मैदानावर होणाऱ्या मालिकेला मुकणार आहे. विराट कोहलीपाठोपाठ भारताचा मधल्या फळीतील फलंदाज श्रेयस अय्यरदेखील मालिकेतून बाहेर पडला आहे. दुखापतीमुळे तो उर्वरित मालिकेला मुकणार आहे. बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये सध्या त्याच्यावर उपचार चालू आहे. बीसीसीआय त्याच्या सुधारणेवर बारकाईने लक्ष ठेवून आहे.ती बातमी म्हणजे मधल्या फळीतील भरवशाचा फलंदाज लोकेश राहुल आणि अष्टपैलू खेळाडू रवींद्र जडेजाचं संघात पुनरागमन झालं आहे. परंतु, बीसीसीआयने स्पष्ट केलं आहे की हे दोन्ही खेळाडू फिटनेस टेस्टमध्ये पास झाले तरच त्यांचा अंतिम ११ जणांच्या संघात समावेश केला जाऊ शकतो.भारताच्या वरिष्ठ निवड समितीने शुक्रवारीया बैठकीत इंग्लंडविरुद्धच्या उर्वरित तीन कसोटी सामन्यांसाठी भारतीय संघाची निवड करण्यात आली. आज सकाळी या संघाची घोषणा करण्यात आली. निवड समितीने संघात फार मोठे फेरबदल केलेले नाहीत. केवळ आकाश दीप या नव्या खेळाडूचा भारतीय संघात समावेश करण्यात आला आहे. विराट आणि श्रेयसचा संघात समावेश न केल्यामुळे सरफराज खान आणि रजत पाटीदारच्या संघातील स्थानाला धक्का लागलेला नाही.दुसऱ्या बाजूला, भारतीय क्रिकेटरसिकांना विराटला पांढऱ्या जर्सीत पाहण्यासाठी आणखी काही दिवस वाट पाहावी लागणार आहे. कारण,इं ग्लंडविरुद्धच्या मालिकेत तो खेळणार नाही. विराटने त्याच्या अनुपस्थितीबाबत संघ व्यवस्थापनाला आणि निवड समितीला कळवलं आहे. वैयक्तिक कारणांमुळे तो या मालिकेत खेळू शकणार नाही. त्यामुळे पदार्पणानंतर पहिल्यांदाच विराट कोहली घरच्या मैदानावर होणाऱ्या मालिकेला मुकणार आहे.

### अय्यरदेखील मालिकेतून बाहेर

» विराट कोहलीपाठोपाठ भारताचा मधल्या फळीतील फलंदाज श्रेयस अय्यरदेखील मालिकेतून बाहेर पडला आहे. दुखापतीमुळे तो उर्वरित मालिकेला मुकणार आहे. बंगळुरू येथील राष्ट्रीय क्रिकेट अकादमीमध्ये सध्या त्याच्यावर उपचार चालू आहे. बीसीसीआय त्याच्या सुधारणेवर बारकाईने लक्ष ठेवून आहे. अनेक दिवसांच्या प्रतीक्षेनंतर अखेर भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) इंग्लंडविरुद्धच्या कसोटी मालिकेतील उर्वरित तीन सामन्यांसाठी भारतीय संघाची घोषणा केली आहे. याद्वारे गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असलेल्या मुद्द्यावर अखेर पडदा पडला आहे.

# रवींद्र जाडेजाच्या घरात कौटुंबिक वाद उफाळला

## जाडेजाचे वडील अनिरुद्ध सिंह यांचे सून रिवाबा हिच्यावर मोठे आरोप

।नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**क्रिकेटर रवींद्र जाडेजाच्या घरात कौटुंबिक वाद उफाळला आहे. रवींद्र जाडेजाचे वडील अनिरुद्ध सिंह यांनी सून रिवाबा हिच्यावर मोठे आरोप केले आहेत. त्याशिवाय रवींद्र जाडेजावरही नाराजी व्यक्त केली आहे. रवींद्र जाडेजासोबत माझं कोणतेही नातं नाही. त्याच्यावर रिवाबानं जादू केली आहे. तिला फक्त पैसे हवे असतात, असा आरोप अनिरुद्ध सिंह यांनी केला आहे. अनिरुद्ध सिंह यांच्या या आरोपाला रवींद्र जाडेजा याने ट्वीट करत उत्तर दिलेय.**



दैनिक भास्करनं रवींद्र जाडेजाचे वडील अनिरुद्ध सिंह यांची मुलाखत छापली. त्यामध्ये अनिरुद्ध सिंह यांनी सून रिवाबा जाडेजावर खूप गंभीर आरोप केले आहेत. मुलाखतीनुसार, अनिरुद्ध सिंह यांचा रवींद्र जाडेजा आणि रिवाबा जाडेजा यांच्यासोबत कोणताही संबंध नाही. ते वेगळे राहतात त्याशिवाय रिवाबा हिच्यावर जादूटोणा केल्याचा आरोपही केला आहे.माझा रवींद्र जाडेजा अथवा त्याच्या पत्नीसोबत कोणताही संबंध नाही. ते आम्हाला बोलवत नाहीत, अथवा आम्ही त्यांना बोलवत नाही. रवींद्र जाडेजाच्या लग्नानंतर दोन तीन महिन्यातच वादाला सुरुवात झाली. सध्या जामनगरमध्ये मी एकटाच राहतो. रवींद्र जाडेजा वेगळा राहतो. रविबाने त्याच्यावर काय जादू केली माहित नाही. माझा तर मुलगा आहे, मला खूप वाईट वाटतं. त्याचं लग्न झालं नसतं तर बरं झालं असतं. त्याला क्रिकेटर केले नसतं तर बरं झालं असतं. आम्ही या परिस्थितीमध्ये तर राहिलो नसतो, अशी खंत मीडियासमोर अनिरुद्ध सिंह यांनी व्यक्त केली. रवींद्र जाडेजाचे वडील अनिरुद्ध सिंह यांनी नुकतेच प्रसारमाध्यमांना मुलाखत दिली. त्यामध्ये त्यांनी मुलगा आणि सूनेवर गंभीर आरोप केले. तसेच रवींद्र जाडेजासोबत राहत नसल्याचेही त्यांनी सांगितलं. त्याशिवाय रवींद्र जाडेजाची पत्नी रिवाबावर गंभीर आरोप केले.

### आरोपाला जाडेजाने उत्तर दिले

» वडिलांच्या आरोपावर रवींद्र जाडेजानं स्पष्टीकरण दिलेय. सोशल मीडियावर पोस्ट करत मुलाखतीतील सर्व मुद्दे खोटे आणि चुकीचे असल्याचं त्यांनी सांगितलं. खूप साऱ्या गोष्टी आहेत, ज्या सोशल मीडियावर लिहू शकत नाही. माझी पत्नी आणि मला बदनाम केले जातेय, असेही जाडेजानं म्हटलेय. क्रिकेटर रवींद्र जाडेजाच्या घरात कौटुंबिक वाद उफाळला आहे. रवींद्र जाडेजाचे वडील अनिरुद्ध सिंह यांनी सून रिवाबा हिच्यावर मोठे आरोप केले आहेत. त्याशिवाय रवींद्र जाडेजावरही नाराजी व्यक्त केली आहे. रवींद्र जाडेजासोबत माझं कोणतेही नातं नाही. त्याच्यावर रिवाबानं जादू केली आहे. तिला फक्त पैसे हवे असतात अनिरुद्ध सिंह यांच्या या आरोपाला रवींद्र जाडेजा याने ट्वीट करत उत्तर दिलेय.